इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

कार्यक्रम पत्रिका क्र. (७/२०२६)
स्थायी समिती सभा

दिनांक- १०/०७/२०२६

प्रति.

मा. ----------
स्थायी समिती सदस्य / सदस्या,
इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

महोदय,

इचलकरंजी महानगरपालिका मा. स्थायी समिती सदस्य यांना नोटीस देणेत येते की इचलकरंजी महानगरपालिका स्थायी समितीची सभा सोमवार दि. १३/०७/२०२६ रोजी दुपारी १२:१५ वाजता इचलकरंजी महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील स्थायी समिती सभागृह येथे भरविणेत येत आहे.

तरी सदर सभेस उपस्थित राहणेबद्दल आपणास विनंती करणेत येत आहे.

(सविश्री वसंतराव मुळीक)
सभापती,
स्थायी समिती

****

परिशिष्ठ

विषय क्र. १ : मागील सभा दि. ०६/०७/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिका पु. अहिल्यादेवी होळकर विकली मार्केट येथील गाळा क्र. २२ श्री. यासीन आयुब नदाफ यांना मंजूर आहे. तथापि त्यांनी सदर गाळा क्र. २२ ऐवजी गाळा क्र. १९ मिळणेची मागणी केलेबाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव.

विषय क्र. ३ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दिमध्ये घरोघरी कचरा संकलन करणेकामी तयार करणेत आले र.रु. २२,००,१८,३२२/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देणे बाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव.

विषय क्र. ४ : इचलकरंजी महानगरपालिकेकडील सन २०२६-२७ सालासाठी विविंध विभागाकडे असणारे संगणक साहित्य, प्रिंटर व सीसीटीव्ही पुरवठा आणि रिपेअरी कामी तयार करणेत आलेले र.रु ३८,००,०००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देणे बाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव.

विषय क्र. ५ : मा.सभापती यांचे परवानगीने घेणेत येणारे ऐनवेळचे इतर विषय.

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०७

स्था. स. ठराव क्र.३६
दि. १३/०७/२०२६

विषय क्र. १ : मागील सभा दि. ०६/०७/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.

ठराव

मागील दि. ०६/०७/२०२६ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त प्र. नगरसचिव यांनी सभेसमोर वाचुन दाखवले ते योग्य व बरोबर असलेने कायम करणेत येत आहे.

सूचक : र.ला. जनुते

अनुमोदक : सु.बा. कणगले.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०७

स्था. स. ठराव क्र.३७
दि. १३/०७/२०२६

विषय क्र. २ : इचलकरंजी महानगरपालिका पु. अहिल्यादेवी होळकर विकली मार्केट येथील गाळा क्र. २२ श्री. यासीन आयुब नदाफ यांना मंजूर आहे. तथापि त्यांनी सदर गाळा क्र. २२ ऐवजी गाळा क्र. १९ मिळणेची मागणी केलेबाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव.

ठराव

दि. १०/१२/२०२५ च्या गाळे ई-निविदा प्रक्रियेत मनपा मालकीच्या पु.अहिल्यादेवी होळकर विकली मार्केट येथील गाळा क्र.२२ करिता भाग घेतलेले उच्चांक निविदा बोली धारक श्री.यासीन आयुब नदाफ यांनी सदर गाळा नाकारून त्याऐवजी दुसरा गाळा उपलब्ध करून मिळणेबाबत मागणी केल्यामुळे दोन नंबरचे ई-निविदा बोली धारक श्रीमती सुरेखा सुरेंद्र मुल्या यांना इकडील दि.२२/०६/२०२६ च्या पत्राने त्यांच्या बोली रक्कमेपेक्षा जादाच्या बोली रक्कमेची विचारणा केली असता त्यांनी दि.२३/०६/२०२६ च्या पत्राने रक्कम रु.१,३०,०००/- इतकी भरणेस तयार असल्याचे कळविले आहे.

पु.अहिल्यादेवी होळकर विकली मार्केट येथील गाळा क्र.१९ ला वेळोवेळी लिलाव काढून देखील प्रतिसाद अप्राप्त आहे. त्यामुळे श्री. यासीन आयुब नदाफ यांना गाळा क्र.१९ देणेबाबत व गाळा क्र.२२ चे दोन नंबर निविदा बोली धारक श्रीमती सुरेखा सुरेंद्र मुल्या यांनी सदर गाळ्याची जादाची बोली रक्कम रु.१,३०,०००/- इतकी भरणेस तयार असल्याने गाळा क्र. १९ श्री. यासीन आयुब नदाफ यांना व गाळा क्र. २२ श्रीमती सुरेखा सुरेंद्र मुल्या यांना भाडेपट्ट्याने देणेबाबत मे.स्थायी समितीमध्ये निर्णय होणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार पु.अहिल्यादेवी होळकर विकली मार्केट येथील गाळा क्र.१९ श्री. यासीन आयुब नदाफ यांना व गाळा क्र. २२ श्रीमती सुरेखा सुरेंद्र मुल्या यांना महानगरपालिका अटी / शर्ती नुसार भाडेपट्ट्याने देणेस मंजुरी देणेत येत आहे.

सूचक : स.बा. कळागते

अनुमोदक : र.ता. रजपुते

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०७

स्था. स. ठराव क्र.३८
दि. १३/०७/२०२६

विषय: दि. १३/०७/२०२६ रोजीची सभा दि. १५/०७/२०२६ रोजी दुपारी १२:१५ वाजेपर्यंत तहकुब करणेबाबत.

ठराव

आज दि. १३/०७/२०२६ रोजी आयोजीत करणेत आलेली स्थायी समितीची सभा दि. १५/०७/२०२६ रोजी दुपारी १२:१५ वाजेपर्यंत तहकुब करणेत येत आहे.

सूचक: र. ला. रजपुते

अनुमोदक: सु. बा. कलागते.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

मा. स्थायी सभा क्र.०७
(तहकुब दि.१३/०७/२०२६)

स्था. स. ठराव क्र. ३९
दि. १५/०७/२०२६

विषय क्र. ३ : इचलकरंजी महानगरपालिका हद्दिमध्ये घरोघरी कचरा संकलन करणेकामी तयार करणेत आले र.रु. २२,००,१८,३२२/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देणे बाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव.

ठराव

सदर विषयाबाबत आलेली सूचना वाचणेत आली, त्यास एक उपसूचना प्राप्त झाली ती खालिल प्रमाणे,

उपसूचना

सदर विषयाबाबत आलेला प्रस्ताव वाचणेत आला.

सदर कामाचे अंदाजपत्रक करणेत येत असता घरोघरी कचरा संकलन करणे, त्यासाठी गाड्या भाडे तत्वावर घेणे, शहरातील झोपडपट्टी भाग, बाग-बगीचे, ऑक्सिजन पार्क, हॉटेल्स, हॉस्पिटल, कार्यालये यामधिल निर्माण होणारा कचरा स्वतंत्ररित्या संकलन करणे, कच-याचे संकलन विभागीय कार्यालयस्तरावर करुन वाहतुक करणे, वाहतुकीसाठी तसेच कचरा संकलनासाठी गाड्या भाड्याने घेणे, यासाठी मनुष्यबळ पुरवठा करणे, केंदाळ काढणे यासाठी एकत्रच अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

तरी सदरकामी एकच अंदाजपत्रक न करता प्रत्येक बाबीसाठी वेगवेगळे अंदाजपत्रक तयार करणेत यावे.

सूचक : ता.बा.पोवार

अनुमोदक : प्र.ना.धुत्रे

वरील उपसूचना मतास टाकली असता त्यास,

अनुकुल मते - ९ प्रतिकुल मते - ६ तटस्थ - ०

वरील प्रमाणे मतदान होवून उपसूचना बहुमतांनी मंजुर करणेत आली.

यानंतर मुळ सूचना मतास टाकली असता त्यास,

अनुकुल मते — ६ प्रतिकुल मते - ९ तटस्थ - ०

याप्रमाणे मतदान होवून खालिल प्रमाणे आलेली मुळसूचना बहुमतांनी नामंजुर करणेत आली.

मुळसूचना

इचलकरंजी शहरामध्ये घरोघरी जाऊन कचरा गोळा करणेकामी मक्तेदार यांचेकडुन नियोजित वेळेनुसार घरोघरी घंटागाडी मार्फत कचरा संकलन व उठाव न होणे,कचरा संकलनासाठी आवश्यक मनुष्यबळ व वाहनांची उपलब्धता नसणे तसेच कोणतीही पूर्वकल्पना न देता वारंवार कर्मचाऱ्यांकडून संप करणे या गोष्टी वारंवार घडत आहेत यामुळे घरोघरी कचरा गोळा करणेच्या कामावर मोठा परिणाम होत असुन शहरातील स्वच्छता व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होत आहे व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. मक्तेदार यांना कार्यालयाकडुन वेळोवेळी तोंडी सूचना, लेखी नोटीस व दंडात्मक कारवाई करूनही त्यांच्या कामकाजामध्ये सुधारणा झालेली नाही. मक्तेदार यांनी करारातील अटी व शर्तींचा भंग केलेला आहे.

त्यामुळे नागरीक व नगरसेवकांच्या तक्रारी आणि शहराचे आरोग्याचा विचार करुन त्यांचा कामाचा मक्ता दि. ३०/०४/२०२६ रोजी अखेर पासुन मुदत पूर्व रद्द करणेत आला आहे. मात्र घरोघरी जाऊन कचरा गोळा करणेकामी अंदाजपत्रक तयार करुन व नव्याने निविदा प्रक्रिया करुन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी मक्तेदार नितीन डी. कदम (LLP) यांचे कडुन काम करुन घेणेत यावे. असा मार्च २०२६ च्या महासभेतील ठराव क्रमांक २८ नुसार झाला आहे.

(पुढील पानावर . . . .)

Scanned with OKEN Scanner

त्यानुसार घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करणेकरीता शहरातील झोपडपट्टी भाग, बाग बगिचे, ऑक्सीजन पार्क, मार्केट, हॉटेल्स, हॉस्पिटल्स, कार्यालये यामधील निर्माण होणारा कचरा स्वतंत्र रित्या संकलन, वाहतुक करणे तसेच बागबगीच्या मध्ये मनुष्यबळ पुरवठा करणे, महानगरपालिका मुख्य इमारत व विभागीय कार्यालय स्तरावरील निरीक्षण प्रणाली इ. बाबीचा समावेश असलेले र.रु. २२,००,१८,३५२/- रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून सदर अंदाजपत्रक मंजुरीबाबत कार्यालयाने मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर केला आहे.

तरी इचलकरंजी महानगरपालिका हद्दिमध्ये घरोघरी कचरा संकलन करणेकामी तयार करणेत आले र.रु. २२,००,१८,३२२/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देणेत येत आहे.

सूचक : र.सा.रजपुते

अनुमोदक : नि.कि.पोवार

निर्णय : इचलकरंजी महानगरपालिका हद्दिमध्ये घरोघरी कचरा संकलन करणेकामी तयार करणेत आलेले र.रु. २२,००,१८,३२२/- चे अंदाजपत्रक मंजूरी बाबतचा प्रस्ताव बहुमतांनी नामंजुर करणेत आला.

सभापती
स्थायी समिती
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

मा. स्थायी सभा क्र.०७

स्था. स. ठराव क्र.४०
दि. १५/०७/२०२६

विषय क्र. ४ : इचलकरंजी महानगरपालिकेकडील सन २०२६-२७ सालासाठी विविध विभागाकडे असणारे संगणक साहित्य, प्रिंटर व सीसीटीव्ही पुरवठा आणि रिपेअरी कामी तयार करणेत आलेले र.रु ३८,००,०००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देणे बाबत कार्यालयाने सादर केलेला प्रस्ताव.

ठराव

इचलकरंजी महानगरपालिकेकडील सन २०२६-२७ सालासाठी विविध विभागाकडे असणारे संगणक साहित्य, प्रिंटर व सीसीटीव्ही पुरवठा आणि रिपेअरी कामी तयार करणेत आलेले र.रु ३८,००,०००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत कार्यालयाने प्रस्ताव सादर केला आहे.

तरी कार्यालयीन प्रस्तावानुसार इचलकरंजी महानगरपालिकेकडील सन २०२६-२७ सालासाठी विविध विभागाकडे असणारे संगणक साहित्य, प्रिंटर व सीसीटीव्ही पुरवठा आणि रिपेअरी कामी र.रु ३८,००,०००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देणेत येत आहे.

सूचक : स्व. बा. कळगते

अनुमोदक : र. स. रजपुते.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner

इचलकरंजी महानगरपालिका

स्था. स. ठराव क्र. ४१
दि. १५/०७/२०२६

मा. स्थायी सभा क्र.०७
(सभा दिनांक दि.१३/०७/२०२६)

विषय क्र. ३ : सन २०२६/२०२७ मध्ये इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत साज-या करावयाच्या थोर पुरुषांची जयंती / पुण्यतिथी व इतर समारंभाबाबत निर्णय घेणे.

ठराव

सन २०२६/२०२७ मध्ये इचलकरंजी महानगरपालिकेमार्फत खालिल प्रमाणे थोर पुरुषांची जयंती / पुण्यतिथी व इतर समारंभ आयोजित करणेत यावेत तसेच त्याकरीता खालिल प्रमाणे खर्चाची मर्यादा निश्चित करणेत येत असून या मर्यादेस अनुसरुन सदरचे समारंभ साजरे करणे करीता आवश्यक ती कार्यवाही करणेचे अधिकार मा. आयुक्त यांना देणेत येत आहेत.

अ.नं.	कार्यक्रमाचे नाव	दिनांक	रक्कम
१	सावित्रीबाई फुले जयंती	०३/०१/२०२६	
२	जिजाऊ माँ साहेब जयंती	१२/०१/२०२६	
३	स्वामी विवेकानंद जयंती	१२/०१/२०२६	
४	नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती	२३/०१/२०२६	
५	बाळासाहेब ठाकरे जयंती	२३/०१/२०२६	
६	२६ जानेवारी प्रजासत्ताक दिन	२६/०१/२०२६	१० लाख
७	राष्ट्रपिता म. गांधी पुण्यतिथी	३०/०१/२०२६	
८	संत रविदास महाराज जयंती (तिथीनुसार)	१२/०२/२०२६	
९	संत सेवालाल महाराज जयंती	१५/०२/२०२६	
१०	लहुजी साळवे पुण्यतिथी	१७/०२/२०२६	
११	छ. शिवाजी महाराज जयंती	१९/०२/२०२६	५ लाख
१२	बाळशास्त्री जांभेकर जयंती	२०/०२/२०२६	
१३	संत गाडगे महाराज जयंती	२३/०२/२०२६	
१४	स्व. यशवंतराव चव्हाण जयंती	१२/०३/२०२६	
१५	शहीद दिन	२३/०३/२०२६	
१६	महात्मा जोतीबा फुले जयंती	११/०४/२०२६	
१७	भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती	१४/०४/२०२६	५ लाख
१८	माजी नगराध्यक्ष व माजी आमदार कॉ. के. एल. मलाबादे पुण्यतिथी	१६/०४/२०२६	
१९	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती	३०/०४/२०२६	
२०	महात्मा बसवेश्वर जयंती (तिथी नुसार)	३०/०४/२०२६	१ लाख
२१	छ. संभाजी महाराज जयंती	१४/०५/२०२६	५ लाख
२२	दहशतवाद व हिसांचार विरोध दिन	२१/०५/२०२६	
२३	देशभक्त बाबासाहेब खंजीरे स्मृती दिन	२६/०५/२०२६	
२४	स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर जयंती	२८/०५/२०२६	
२५	महाराणा प्रताप जयंती (जेष्ठ शुक्ल तृतीया तिथीनुसार)	२९/०५/२०२६	
२६	अहिल्यादेवी होळकर जयंती	३१/०५/२०२६	४ लाख
२७	शिवराज्याभिषेक दिन	०६/०६/२०२६	२ लाख
२८	राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती	२६/०६/२०२६	
२९	माजी मुख्यमंत्री, वसंतराव नाईक जयंती	०१/०७/२०२६	
३०	श्री. संत गुलाबराव महाराज जयंती	०६/०७/२०२६	
३१	नरवीर शिवा काशिद पुण्यतिथी (तिथीनुसार)	१०/०७/२०२६	१ लाख
३२	लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुण्यतिथी	१८/०७/२०२६	

Scanned with OKEN Scanner

३३	लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती.	२३/०७/२०२६	
३४	लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यातिथी	०१/०८/२०२६	
३५	लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती	०१/०८/२०२६	३ लाख
३६	क्रांतीसिंह नाना पाटील जयंती	०३/०८/२०२६	
३७	क्रांती दिन	०९/०८/२०२६	
३८	भारतीय स्वातंत्र्य दिन ध्वजारोहण समारंभ	१५/०८/२०२६	५ लाख
३९	माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी जयंती (सद्भावना दिवस	२०/०८/२०२६	
४०	भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिन जयंती	२५/०८/२०२६	
४१	राजे उमाजी नाईक जयंती	०७/०९/२०२६	
४२	दे.भ.रत्नाप्पाण्णा कुंभार जयंती	१५/०९/२०२६	
४३	केशव सिताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे जयंती	१७/०९/२०२६	
४४	पं. दिनदयाळ उपाध्याय जयंती-अंत्योदय दिवस	२५/०९/२०२६	५० हजार
४५	महात्मा गांधी जयंती, लालबहादूर शास्त्री जयंती	०२/१०/२०२६	
४६	महर्षि वाल्मिकी जयंती (तिथीनुसार)	०७/१०/२०२६	
४७	डॉ.ए.पी. जे अब्दुल कलाम जयंती	१५/१०/२०२६	
४८	श्रीमंत नारायणराव घोरपडे (सरकार) पुण्यतिथी	२१/१०/२०२६	
४९	इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिवस, सरदार वल्लभभाई पटेल जयंती व राष्ट्रीय एकता दिवस	३१/१०/२०२६	
५०	माजी पंतप्रधान स्व. पंडीत जवाहरलाल नेहरू जयंती	१४/११/२०२६	
५१	लहुजी साळवे जयंती	१४/११/२०२६	
५२	बिरसा मुंडा जयंती	१५/११/२०२६	
५३	इ.न.प.चे पहिले नगराध्यक्ष, पत्रकार जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक कै. बाळासाहेब चिवटे जयंती	१७/११/२०२६	
५४	माजी पंतप्रधान स्व इंदिराजी गांधी जयंती (राष्ट्रिय एकात्मता दिन) व माजी खासदार सहकार महर्षी कै. दत्ताजीराव कदम पुण्यातिथी	१९/११/२०२६	
५५	श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे (सरकार) जयंती	२५/११/२०२६	५० हजार
५६	संविधान दिवस, भारतीय संविधानाच्या उददेशिकेचे सामुहीक वाचन करणे.	२६/११/२०२६	५० हजार
५७	महात्मा जोतिबा फुले पुण्यातिथी	२८/११/२०२६	
५८	माजी खासदार स्व. बाळासाहेब माने पुण्यतिथी	०४/१२/२०२६	
५९	डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन	०६/१२/२०२६	
६०	संत जगनाडे महाराज जयंती	०८/१२/२०२६	
६१	अटल बिहारी वाजपेयी जयंती	२५/१२/२०२६	
६२	वीर बाल दिवस	२६/१२/२०२६	
६३	डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख जयंती	२७/१२/२०२६	
६४	१ मे महाराष्ट्र दिन (कामगार दिनानिमित्त कार्यक्रम)	०१/०५/२०२६	२.५ लाख
६५	इचलकरंजी महानगरपालिका वर्धापन दिन	२९/०६/२०२६	२.५ लाख
६६	विणकर दिन	०७/०८/२०२६	१ लाख
६७	रंगभुमी दिन	०५/११/२०२६	५० हजार

वर नमुद तरतुद केलेल्या खर्चाव्यतीरीक्त इतर कार्यक्रमांसाठी रु. १ लाख तरतुद करणेत येत आहे.

सूचक : सु. बा. कळगमे. अनुमोदक : र. ला. रजपुते.

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती

Scanned with OKEN Scanner